1170

1170
PĀṬĪL (Puṇḍalīk Rāvajī)
Vīra Jagadevarāva Cāndurakara yāñcā povāḍā. Bhāga pahilā.
[Pāturḍā (Buldana dist.): P.R. Pāṭīla?], 1939.
16 p. 17 cm.
Part 1 of a nationalistic ballad on the activities of the freedom-fighter Jagdevrao Chandurkar, 1928-32.
NAI 1586-87
PP Mar B 49; PIB 113

NATIONAL ARCHIVES OF

NATIONAL ARCHIVES OF INDIA

[चौक १ ला,]

ज्यानें जगति जन्मा येउनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा ह्या शूर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥१॥
या विदर्भ प्रांति ऐकाना । जिल्हा बुलडाणा ॥
तहसिली ह्या मलकापूर । गांव ते त्रिस्वा चांदूर ॥२॥
तये गावि पुण्य भूमित । क्षत्रिय कुळवंत ॥
तुकाराम भालेराव वसती । पत्नि त्यांची राधाबाई ती ॥३॥
अठरासे नव्वदावे साली । श्रेष्ठ ह्या कुली ॥
जन्म जगदेवाचा झाला । जणूं संभाजिच अवतरला ॥४॥
थोर भाग्य तुकारामाचे । राधाबाईचे ॥
पोटि धर्मात्मा अवतरला । ध्वज किर्तीचा फडकविला ॥५॥
पवित्र केले निजकुला । हिरा जन्मला ॥
प्रभा फाकली अंबरात । केला वंश विभूषीत ॥६॥
जसि वाढे चंद्राची कला । वाढुं लागला ॥
तेवि जगदेवहि दिस मास । झाली नऊ वर्ष त्यास ॥७॥
श्रीकृष्ण जेवि गोकुळी । गोपाळा मेळी ॥
खेळ खेळे चेंडु फळीचा । त्यास जो बहुत आवडीचा ॥८॥
तेवीच बाल मंडळी । जमवुनी खेळी ॥
खेळ जगदेवहि कुस्तीचा । त्यास जो बहुत आवडीचा ॥९॥
कुस्तिचा मर्दानी खेळ । खेळे बहु वेळ ॥
धडाधड चीत करी इतरा । म्हणति हा भीमच का दुसरा ॥१०॥
बारा वर्ष होता आयुला । जाउं लागला ॥
लाठि शिकण्यासी जगदेव । दिले आखाड्या मधि नांव ॥११॥

ARCHIVES OF INDIA NATIONAL

शाळेंतील मराठि शिक्षण । माध्यमिक घेऊन ॥ ९
शाळेला ठोकला राम राम । संपला बाल वय क्रम ॥१२॥
संपले बालपण इथें । प्रौढ पणिचें ते ॥
कार्य वर्णिले पुढिल कवनी । शांत चित्ते ध्या ऐकुनी ॥१३॥
ज्याने जगति जन्मा येऊनि । धन्य केलि करणी ॥
पोवाडा त्या शुर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥ धृ ॥

[चौक २ रा]

ऐका हो सर्व सभाजन । पुर्व कालीन ॥
परिस्थिति चांदुर त्रिसंख्याची । शौचनियमति किति हिंदूंची ॥१॥
गाव सोडुन रेल्वे स्टेशन । वसित तिथें जाण ॥
नउशे पन्नास घरे असती । तिन हजार तिथल्ली शिर गणती ॥२॥
तसे गांवि हिंदू मुसलमान । गणति ऐकान ॥
मुसलमान एक हजार असती । दोनपट हिंदूंची गणती ॥३॥
यवनांचे होते संघटन । विस्कळित जाण ॥
हिंदू तेथले तसे वेळी । जाती जातित तो दुफळी ॥४॥
त्या स्थितिचा फायदा घेऊन । गुंड मुसलमान ॥
हिंदुवरि अत्याचार करती । मोगल शाही गाजविती ॥५॥
हिंदूचे देव देवळे ॥ फोडुनि ते वेळे ॥
हिंदूंच्या भजनावरि हल्ला । करित ते चोळुनिया धुल्ला ॥६॥
हिंदूंचि मने दुखवायां । गायि कापाया ॥
नेति तिसयर्च्या मुखातुन । मिरवली मग वस्ती मधुन ॥७॥
हिंदूंचा माल शेतावरी । बांधी जबरी ॥
मालका धमकावुनि चोले । [illegible] जेवी माले ॥८॥

B JUN M

हिंदुच्या कुलिन स्त्रियावर । पोरे द्रीच्चोरं ॥
खडे मारुनि लाविति नयन । उचलुनि नेती जबरीन ॥११॥
चालला नित्य व्यवहार । अनैतिक फार ॥
हिंदु जन त्राहि त्राहि वनले । यावनी त्रासामुळं असले ॥१०॥
एके दिवसि यवने मात केली । हिंदु स्त्री नेली ॥
एक जबरीनें उचलून । रडे अचला ती मोठ्यान ॥११॥
जगदेवराव ते वेळे । स्टेशनाकडे ॥
चालले होते मार्गानं । स्वर एकू आला करुण ॥१२॥
एका हिंदु गरिबस्त्रीवर । म्लेंछ बलात्कार ॥
करीता जगदेवा दिसलें । रक्त अंगातिल सळसळलें ॥१३॥
जगदेव अनिति दुस्मान । सतीचा प्राण ॥
गेला धावत मारुनि दौड । वडविले सोट्यांनी गुंड ॥१४॥
गेले पळुनि नराधम दुरी । राहिलीं घरी ॥
आणले वीर जगदेवानं । वरे हिंदुना त्वेषानं ॥१५॥
नेली समक्ष ओढुनी सती । याचि तुह्यां क्षति ॥
याटली नच नामर्दानो । भागुबाई बनला हिंदुनो ॥१६॥
कंकणे भरुनिया करी । बसारे घरी ॥
नेति तमच्या भगिनी यवन । मिशा काय ओठावरि असुन ॥१७॥
हिंदुच्या जन्मुनी कुला । वरा लाविला ॥
धवल कीर्तिच्या पुर्वजांचे । कुली जन्मुन काय कामाचे ॥१८॥
परधर्मि तुमचि इज्जत । डोळ्या देखत ॥
घेति तरि बघता नेत्र मिटुनी । लज्जा राक्षसि का विकुनी ॥१९॥

पुर्वजांचा वाचा इतिहास । वदे हिंदूस ॥
बघा चडिलांनि काय केले । इज्जतिसांठि प्राण दिधले ॥२०॥
प्राचीन दिव्य सति सिता । रावणे नेता ॥
करुनि प्रतिकार जटायूनं । जिवाचे दिधले बलिदान ॥२१॥
दुर्जनें अरुंधति सति । नेतां सोडण्याती ॥
प्राण तानाजीनें दिधला । स्वाभिमान किति होता त्याला ॥२२॥
किति संभाजिचा अभिमान । जाज्वल्य जाण ॥
धर्मावरि श्रद्धा किती त्याची । केलि नाहि पर्वा प्राणाची ॥२३॥
इज्जतीसाठि दिले प्राण । पुर्वजे जाण ॥
पंढ तुझि त्या उदरी आले । का नच भाळाणी मेले ॥२४॥
शिवबाचे जमुन मावळे । यात्रनी चाळे ॥
बंद केले संघटना करुन । बोध घ्या इतिहासा मधुन ॥२५॥
शोंबले हृदयि वाकबाण । हिंदूंच्या जाण ॥
हिंदु मग संघटीत बनले । यवन प्रतिकारासी सजले ॥२६॥
स्थापून मराठा मंडळ । केलि चळवळ ॥
दिले शिक्षण आखाड्याचे । खेळ शिकतीले कुस्तीचे ॥२७॥
लाठि शिकुन केले तय्यार । मराठा वीर ॥
प्रसंग पडतांच धावुन येती । प्रतीकार यवनांचा करती ॥२८॥
चोऱ्या करणे झाले मग बंद । स्त्रियांचा वाद ॥
सोडणे भाग मुसलमाना । खुपले जगदेव त्यांचे मना ॥२९॥
यवनांनी विचार मग केला । बसुनि मशिदिला ॥
जगवा कारण दुश्मन अपना । भागहरी करना है अपना ॥३०॥

हिंदुकू किया हुश्यार । बने शिरजोर ॥
नहीं कुंच चलता अवि अपना । पिटो सालेकू काटोना ॥३१॥
कहनिया अशा वलगना । मारण्या जाणा ॥
टपुनि या बसले मुसलमान । वाट संधीची पाहून ॥३२॥
जगदेवा नाद भजनाचा । होता हो साचा ॥
होत भजनामधि तल्लीन । करुन देवाचे चिंतन ॥३३॥
जमवूनि भजनि मंडळी । मारुति देउळि ॥
थाट उद्धवीती भजनाचा । गजर करुनी इश नामाचा ॥ ॥३४॥
दर दशमि दिवसि शरगत । चांदुर बिस्पांत ॥
पुर्वि कादित हिंदु जनता । बंद केलि यवनांनी हल्लिना ॥३५॥
शरगस्त मिरवणूकीचा । रिवाज पूर्विचा ॥
चालु केला जगदेवान । खपला यवना मनि म्हणंन ॥३६॥
एके दिवसि जमवुन मंडळी । भजन देऊळी ॥
संत जगदेव करित बसले । काय त्या समयासी वहले ॥३७॥
पुंडलीक वरदे बिट्ठल । गर्जना बोल ॥
ऐकुनी यवन मनी चिडले । मंदिरा मधि धावुन आले ॥३८॥
तुकयाचे किर्तनी जसे । वहले असे ॥
मुसलमानांनि शिवाजीस । तीच गति आजि जगदेवास ॥३९॥
दिसि धमकि भजनि मंडळिला मना करो कल्ला ॥
भजन तुम बंद करो म्हणती । दहशत देउनि हिंदु प्रती ॥४०॥
लाहि घातली भीक धमकिला । इषारा दिला ॥
भजनि मंडळीस रावानं । भजनं बालू था जोरानं ॥४१॥

एकून वाणि वीराची । गेलि यवनांची ॥
आग पायाचि मस्तकाला । चढविला भजनावरि हल्ला ॥४२॥
पुंडलीक वरदे हरी । ठोकुन ललकारी ॥
मस्ति गुंडांचि जिरवण्याला । करायां प्रतिकारा सजला ॥४३॥
झाले सज्ज भजनिही सगळे । टेचण्यां चाळे ॥
गुंड यवनांचे टाळानं । घाबरुन गेले मग यवन ॥४४॥
यवनांचा उतरला धुल्ला । म्हणति या अल्ला ॥
मागे पाहती पुढें पळती । धडाधड टेचाळून पडती ॥४५॥
आले श्वानापरी लहाकत । गुंड मशिदीत ॥
शांत मग तिथें मनी झाले । वेडा जंजाल जग्या वदले ॥४६॥
जगानें जगति जन्मा येऊनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा ह्या शुर मर्दाचा एका शांत चित्त साचा ॥४७॥

श्लोक २ रा

१९२८ सन । तीथी एकानं ॥
व्दीतीया वैशाख महिन्याची । पालखी निघलि शिवाजीची ॥१॥
शेंकडो हिंदु ते जन । दिड्या घेउन ॥
पालखी मिरवति गांवांत । दिली जगदेवे हिंमत ॥२॥
वाजंत्रि वाजती पुढें । सनया चौघडे ॥
मृदंग टाळांचा शनकार । करिति इश नामाचा गजर ॥३॥
आलि गस्त मशिदी पुढें । यावनी गुंड ॥
बाजा मत बजाव यहां म्हणती । तुम्हारा हक्क नहीं वदती ॥४॥
जगदेव म्हणति यवनांस । हिंदुधर्मानास ॥
इमचि सन दशके शककाला । मुसलमान नम्रता औषधाला ॥५॥

ह्यॉ समई तुमची मेजत । नव्हतिरे इथं ॥
हिंदुचं देवालय होतं । भजन इथं चाले दिन रात ॥६॥
हिंदुचा हक्क हिरावुन । जबर दस्तिन ॥
तुम्ही चेतला साक्ष यांस । बघा मागिल तो इतिहास ॥७॥
पुर्वीचा आमुचा हक्क । बजावतो चोख ॥
नसे अन्याय यांत कांही । गाजविता तुम्ही मोंगलशाही ॥८॥
ते असो परि ह्या गांवांत । न्यावि शूरगस्त ॥
वाजवित रित चालत आली । आज पावेतो मशिदि स्थली ॥९॥
सरकारि रत्यावरि जाण । हिंदु मुसलमान ॥
सर्वा मोकळीक वाजवण्याची । बंद पाडणे अन्याय हाची ॥१०॥
होत असेल नमाजी भंग । तरी व्हा दंग ॥
योग्यासम अमुक्या गिरि कुहरी । मशिद बांधुनि नगरा दूरी ॥११॥
नहि करोगे बाजा तुम बंद । म्हणति आर्यिध ॥
तुमकु कोटेंगे धमकि दिधली । पालखी त्यांनी आडविली ॥१२॥
नाहि घातलि भीक धमकिला । इषारा दिला ॥
हिंदुला त्रि जगदेवान । वाजवा बाजे जोरान ॥१३॥
ऐकून वाणि वीराचि । गेलि यवनांची ॥
आग पडलेलिचि मस्तकाला । चढविला पाल्खिवरि हल्ला ॥१४॥
करुनिया सिंह गर्जना । विरोसें जाणा ॥
घातली झडपं सपाचरती । जिरवण्या यवनांची मस्ती ॥१५॥
धावले हिंदूही सर्व । केला प्रतिकार ॥
भग्न यवनांचा उद्दंडपणा । हल्ला धैर्याने परतविला ॥१६॥

दाणोदाण झाले मुसलमान । तोबा तोबा करुन ॥
धावता भुमि झाली थोडी । उडाली ती घाबरगुंडी ॥१७॥
यवनांनी दावा केला पेश । सुटले निर्दोष ॥
राव जगदेव तये काली । शिक्षा यवनांना सुनावीली ॥१८॥
पालखी गेलि मिरवत । वाजत गाजत ॥
मुसलमान मनांत जळफळले । बडा जंजाल जुल्या वदले ॥१९॥
धाके पडले कंसासम मनी । शयनि भोजनी ॥
कृष्ण जगदेव दिसे नयनी । दचकुन उठती झोपेतुनी ॥२०॥
जगदेव जळे अंतरी । कसावे काय तरी ॥
मुसलमान निवंचनेत पडले । पुन्हा कारस्थाना रचिले ॥२१॥
गाठके उसिकुं एकला । करोजी हल्ला ॥
विचार मग यवनांनी केला । जगूका करोजि विसमिल्ला ॥२२॥
यापरी करुनिया विचार । यवन अमर ॥
योग्य संधीस बघत बसले । मारण्या जगदेवा सजले ॥२३॥
तिथि गणेश चतुर्थी दिनी । संधि साधुनी ॥
मैजतित बसले मुसलमान । तयारी जय्यत तीं करुन ॥२४॥
जगदेवराव एकटे । स्टेशनावरुडे ॥
चालले मैजतिच्या पुढुनी । झळकले यवनांचे नयनी ॥२५॥
धावले तयांवरि गुंड । घातया तोंड ॥
वीर जगदेवहि तो सजला । करी घेऊन वडगा अपुला ॥२६॥
लागली उभयता झुंज । दाविले तेज ॥
क्षात्र कुल वीर मराठ्यांचे । वीर जगदेवाने साचे ॥२७॥

शत्रुस दाविना पाठ । प्राणाची गाठ ॥
झालि तरि खरा मर्द जाणा । मरे परि हटेन हा अणा ॥२८॥
उतरला कसी ह्या वीर । यवन चौफेर ॥
मुखानें बोलुनिया धुल्ला । प्राणघातक केला हल्ला ॥२९॥
आयुष्य होते परि कांही । आले लवलाही ॥
धावुनी जिवलग गडि त्याचे । प्राण वाचवण्या विराचे ॥३०॥
मित्रांनि प्रतिकार केला । हल्ला परत्वीला ॥
प्राण वाचविला हो मर्दाचा । उडविला धुव्वा यवनांचा ॥३१॥
ज्यानें जगतीं जन्मा येऊनीं । धन्य केली करणी ॥
पोवाडा ह्या शुर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥ध्रु॥

[चौक ४ था.]

१९३२ साले । लढाई जुंपली ॥
इंग्रज आणि हिंदवासि यांची । सिमा केली अन्यायांची ॥१॥
निशस्त्र करुन प्रतिकार । इंग्रजा जेर ॥
कायदे भंग करुनि केले । शत्रुच्या नाकी नव आले ॥२॥
झाले कृद्ध इंग्रज सरकार । सत्याग्रहि वीर ॥
डांबले तुरुंगात धरुनी । मार तो दिधला लाठ्यांनी ॥३॥
दिले निरुस धान्य खावया । गिरणी फोडाया ॥
लावले दळण दळायाला । लावले सक्त मजूरीला ॥४॥
कडकास दंड ठोकले । जसी लाविले ॥
कुणाचे गृह दार लुटे । छळ तो केला अनीत ॥५॥

ह्या कायस्थभंग संग्रामांत जनुने गांवांत ॥
दोनशावरी कैद केले । पुढारी चिंतेमध्यें पडले ॥६॥
वीरांचि पडलिसे वाण । सेनानी कोण ॥
कराव्या ह्याचि प्रश्न पडला । ह्या समयासि पुढाऱ्याला ॥७॥
पुढाऱ्यांनि केला विचार। चांदुरावर ॥
गेले राजांच्या भेटीला । सांगती काय पुढें ह्याला ॥८॥
जनुन्याचे समर भूंवरी । फुंकल्या भेरि ।
सह्यामह युद्ध सुरू केले । आजपावेतो चालविले ॥९॥
शुर सैन्य दोनशांवरी सात अधिकारी ॥
इंग्रजे बंदिवासि केले । कडक शासनांस त्यां दिधले ॥१०॥
वीरांचि पडलिसे वाण । सेनानी जाण ॥
धजेना कोणि जतां पुढती । झालि ती अमुचि असाध्य स्थिती ॥११
युद्धाचे तुम्हां आमंत्रण । द्यावया जाण ॥
आलो आम्हि तुमचे गांवाला। विचार काय कळवा आम्हांला ॥१२
केला हंसत मुख हो स्वीकार । दिला होकार ॥
वचन जगदेवांनी दिधले । पुढारी आनंदित झाले ॥१३॥
जगदेवा कुटुंब संभार । मोठा परिवार ॥
रणामधि कर्ते कुणी नव्हते । कठीण परिस्थिति त्या समयासें ॥१४
त्या समई कच्चा कुणि अरी । असतां हो सरी ।
बळी तो कुटुंब मोहाला । असतांच खाम पडला ॥१५॥
सोडून पत्नि मुलि मुला । तेथि आईला ॥
जाऊं कैचा रणांगणाला । विचार हा असतां मनी आला ॥१६

जो श्वास सिंहाचा छावा । मोह या ठाया ॥
नसे तो कर्तव्या पुढती । विराची परिक्षाच होती ॥१७॥
शिवबाचं आलं सांगणं । तानाजिस ज्ञाण ॥
स्वारि कर कोंडाण्याकरती । सुर्योदयि गड मिळवि हाती ॥१८॥
रायबाचा लग्न सोहळा । सोडुनि तै वेळा ॥
तानांजी सिंहगडी पडला । त्यागूनी कुटुंब मोहाला ॥१९॥
जगदेव शुराचा बच्चा । होता तो सच्चा ॥
सोडूनी प्रेम बंधनाला । रणी जावया सज्ज झाला ॥२०॥
पुढाऱ्यांनि काढले उग्दार । धन्य हा वीर ॥
मराठा कुलांत अवतरला । क्षात्रकुल कर्तव्या सजला ॥२१॥
येऊन पुढाऱ्या समवेत । खाम्गावांत ॥
सभेमधि दिधले व्याख्यान । काय सांगे तो ऐकानं ॥२२॥
आज वर्ष दीडसें झाली । दास्य शृंखली ॥
अडकली माय भुमी अपुली । खितपत पर सत्तेखाली ॥२३॥
कावे बाज ईंग्रज सरकार । लुटीले सर्व ॥
देश कप्फलक बनवीला । मोताद अन्नाला केला ॥२४॥
परि अजुनि स्वस्थ तुम्ही असे । बैसला कसे ॥
लाज तुम्हा नसेच का याची । गुलामी करीता परक्यांची ॥२५॥
परक्यांच्या खाउनिया लाथा । जिवन कंठिता ॥
पुत्र म्हणविता मराठ्यांचे नांव गमविले पुर्वजांचे ॥२६॥
आठवा पुर्व इतिहास । वदा शिवभास ॥
तानाजी काय करुन गेला । राणा अनाथही तसला ॥२७॥

पारतंत्र्य धालवण्या दुरी । समर भूवरी ॥
पुर्वज रक्ताच्या या सरिता । वाहिल्या घोरत तुम्ही पडता ॥२८
बडिव्यांचे धवल किर्तिला । बट्टा लाविला ॥
बुर्खा घेतला बेशरमेचा । खुन केला तो इज्जतीचा ॥२९॥
राखणें कुलाचे नांव । तरी धा धाव ॥
हाति खजीर अहिंसेचा । लढा लढवा स्वातंत्र्याचा ॥३०॥
शोंबळे चढती बाजबाण । ऐकुन व्याख्यान ॥
शेंकडो वीर सज्ज झाले । समर जुन्याचे सुरु केले ॥३१॥
अहिंसा शस्त्र तें जहाल । सत्य ही ढाल ॥
करी घेऊन शौर्य दावा । सत्याग्रहि विजया मिळवा ॥३२॥
कॉंग्रेसचा घेऊनि अधिकार । आठवे डिक्टेटर ॥
बुलडाणा जिल्ह्याचे बनले । समर धडाक्यानें चालविले ॥३३॥
जगदेव शूर सेनापती । हुकुम सोडती ॥
सत्याग्रहि शुर विर दळभार । जावे चालुनि बेदिवर ॥३४॥
तोडून बोरि बासुळा । कायदेभग केला ॥
शौर्य दाखिले इंग्रजास । पदी तुडवुनी कायद्यास ॥३५॥
एक्से सात कलम लावुनी । नेले पकडुनी ॥
शिक्षा दिल्हि सक्त मजूरीची । विशाळा साहा महिन्याची ॥३६॥
आनंदें शिक्षा भोगुनी । राखली बाणी ॥
बुलढाणा युद्ध मंडळाची । सेवा केली राष्ट्राची ॥३७॥
भोगून शिक्षा राव येता । केले स्वागता ॥
देशभक्त ही पदवि दिधली । योग्यता राष्ट्र कार्यि चढली ॥३८॥

[चौक ५ वा.]

जगदेवराव कार्याचा । आढावा याचा ।
ऐका त्यांनि काय काय केले । अल्पचि पुढती सांगितले ॥१॥
मागें हो वर्णिल्या परी । त्रिस्था चांदुरी ॥
मुसलमान हिंदु जनांवरती । अत्याचार नितचि करती ॥२॥
हिंदुंचे व्हावे रक्षण । म्हणूनी जाण ।
हिंदु संघटीत बनविले । कार्य त्यांनी पहिले केले ॥३॥
यवनांचा करण्या प्रतिकार । हिंदु तय्यार ॥
केले वीर जगदेवरावांनी । तयांना हिंमत देऊनी ॥४॥

आखाडा गावि स्थापुन । दिले शिक्षण ॥
हिंदु वीरांना लाठीचे । खेळ शिकवीले कुस्तीचे ॥५॥
पोवाडे रचुन वीरांचे । शूर मराठ्यांचे ॥
गाउनी हिंदुपुढें जाण । मर्द बनवीले हिंदु जन ॥६॥
गांवात करुनि व्याख्यान । धर्म अभिमान ॥
हिंदु मध्यें जागृत हो केला । त्यामुळें यवनां मनि खुपला ॥७॥
यवनांचे तावडीतुन । केले रक्षण ॥
हिंदु अबलांचे रक्षण । सती धर्माचे पालन ॥८॥
आपरी मराठा कुळाचे । बीद ते साचे ॥
आखले वीर जगदेवानं । केले धर्माचे पालन ॥९॥
गांवांत उघडि दवाखाना । मोफतचि जाणा ॥
औषधी वाटे रोग्यास । स्वार्थाचा नाही लवलेश ॥१०॥

ARCHIVES OF INDIA NATIONAL

सोडून काम धंद्यास । रोगि पाहण्यास ॥
जाइ यवनांच्या ही घरि तो मनामध्यें आत्म भाव वसतो ॥११॥
ज्ञानाचा केला प्रसार । मोफतच्चि वार ॥
वाचनालय थापुन गांवी । कवडिही नच लागे यासी ॥१२॥
गरिबांचे मुला आणि मुली । विद्या शिकवली ॥
फुकटची विर जगदेवानं । गावि बोर्डिंगा स्थापून ॥१३॥
कष्टानि देह झिजविला । परोपकार केला ॥
स्वार्थ मनि नच शिवला तिळही । गरीबी घरची असुनी ही ॥१४॥
या परी चांदुर विसव्याचे । कार्य केले साचे ॥
राष्ट्र कार्यार्थ ही तो झटला । देतो आढावा तुम्हांला ॥१५॥
कॉंग्रेसचा करुन स्वीकार । करी तो पुकार ।
यारे भू-मुक्त करुं अपुली । घी रंगी झेंड्याखाली ॥१६॥
शेकडों देऊन व्याख्यानं । खेड्या पाड्यानं ॥
राजकारणा विशद केले । समासद कॉंग्रेस वाढवले ॥१७॥
कॉंग्रेसच्या आज्ञेनुसार । त्यांनि बहिस्कार ॥
पुकारुन परदेशी वस्तु । प्रचार स्वदेशीचा करती ॥१८॥
१९३२ साले साल । सत्याग्रह झाला ॥
भाग घेतला तये समयी । शिक्षा भोगली सक्त मजुरी ॥१९॥
ठिक ठिकाणी ग्रामसुधारणा । मंडळे जाणा ॥
उभारुनि ग्राम सुधारणेस । दिले उत्तेजन जनतेस ॥२०॥
स्थापली परिषद चार । शेतकरी मजूर ॥
जागृती तया मध्यें केली । जाणिव अन्याय त्या दिधली ॥२१॥

काढुनि राष्ट्रसेवक । पत्र पाक्षिक ॥
अज्ञ शेतकऱ्या मार्ग दावी । अमोल सेवा किति वर्णावी ॥२२॥
सामाजीक सुधारणेवरी । किर्तनें करी ॥
बंड मोडण्या अंध रुढिचे । कार्य केले बहु मोलाचे ॥२३॥
खेडोपाडि दौरे काढुन । दिली व्याख्यानं ॥
जागृती केली जनतेत । सोसुनी कष्टां दौऱ्यांत ॥२४॥
समाचार पत्र अकोल्याचे । कार्य तें त्याचें ॥
केले विन वेतन घेऊन । लाविला स्वार्थ घिटाळुन ॥२५॥
त्या परिच मल्लकापुरी । काम तो करी ॥
शिवाजी फ्री बोर्डिंगाचे । वेतन नाहीं कवडीचे ॥२६॥
एका त्यांचि वाग्मय हो सेवा । अमोलिक ठेवा ॥
गेले ग्रंथांचा ठेवून । प्रकाशित नच परि ते अजुन ॥२७॥
गोऱ्यांचे बंड नाटक । भारत आधुनिक ॥
भारत पुत्र जहरि प्याला । नाटकांची पुस्तकमाला ॥२८॥
तानाजीचा रचला पोवाडा । बसईचा वेढा ॥
पोवाडा चालु जमान्याचा । तसा शेतकरी दुर्दशेचा ॥२९॥
तानाजीच्या पोवाड्यावर । खूप पुणेकर ॥
होउनी परितोषक दिधले । हुरये सत्कारासे अर्पियले ॥३०॥
तुकाराम अभंगाची टिका । आत्म बोध ऐका ॥
तसी जगदेवहि भजनावली । तेवि चैतन्य ति पदावली ॥३१॥
या परी ग्रंथ अमोलिक । किरकोळ अनेक ॥
नाही घेतले यांत गणती । संपत कविनांचाही तो अंती ॥३२॥

सोडून काम धंद्यास । रोगि पाहण्यास ॥
जाइ यवनांच्या ही घरि तो मनांमध्यें आत्म भाव वसतो ॥११॥
ज्ञानाचा केला प्रसार । मोफतचि बार ॥
वाचनालय थापुन गांवी । कधडिही नच लागे घाली ॥१२॥
गरिबांचे मुला आणि मुली । विद्या शिकवली ॥
फुकटची विर जगदेवानं । गावि बोर्डिंगा स्थापून ॥१३॥
कष्टानि देह झिजविला । परोपकार केला ॥
स्वार्थ मनि नच शिवला तिळही । गरीबी घरची असुनी ही ॥१४॥
या परी चांदुर बिसन्याचे । कार्य केले साचे ॥
राष्ट्र कार्यार्थ ही तो झटला । देतो आदाचा तुम्हांला ॥१५॥
कॉंग्रेसचा करुन स्वीकार । करी तो पुकार ॥
यारे भू मुक्त करुं अपुली । बी रंगी झेंड्याखाली ॥१६॥
शेकडों देऊन व्याख्यानं । खेड्या पाड्यानं ॥
राजकारणा विशद केले । समासद कॉंग्रेस बनवले ॥१७॥
कॉंग्रेसच्या आज्ञेनुसार । त्यांनि बहिष्कार ॥
पुकारुन परदेशी धरली । प्रचार स्वदेशीचा करली ॥१८॥
१९३२ साले साला । सत्याग्रह झाला ॥
भाग घेतला तये समरी । शिक्षा भोगली मक्त मजुरी ॥१९॥
ठिक ठिकाणी ग्रामसुधारणा । मंडळे जाणा ॥
उभारुनि ग्राम सुधारणेस । दिले उत्तेजन जनतेस ॥२०॥
स्थापली परिषद चार । शेतकरी मजूर ॥
जागृती तया मध्यें केली । जाणिव अन्याय त्या दिधली ॥२१॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

काढूंमि राष्ट्रसेवक । पत्र पाक्षिक ॥
अज्ञ शेतकऱ्या मार्ग दावी । अमोल सेवा किति वर्णावी ॥२२॥
सामाजीक सुधारणेवरी । कितनें करी ॥
वंड मोडण्या अंध रुढिचे । कार्य केले बहु मोलाचे ॥२३॥
खेडोपाडि दौरे काढुन । दिली व्याख्यानं ॥
जागृती केली जनतेत । सोसुनी कष्टा दौऱ्यांत ॥२४॥
समाचार पत्र अकोल्याचे । कार्य तें त्याचें ॥
केले विन वेतनं घेऊन । लाविला स्वार्थ घिट्टाळुन ॥२५॥
त्या परिच मेळकापुरी । काम तो करी ॥
शिवाजी फ्री बोर्डिंगाचे । वेतन नाही कवडीचे ॥२६॥
ऐका त्यांचि वाग्मय हो सेवा । अमोलिक ठेवा ॥
गेले ग्रंथांचा ठेवून । प्रकाशित नव परि ते अजुन ॥२७॥
गोऱ्यांचे त्रेड नाटक । भारत आधुनिक ॥
भारत पुत्र जहरि प्याला । नाटकांची पुस्तकमाला ॥२८॥
तानाजीचा रचला पोवाडा । वसईस्या वेढा ॥
पोवाडा चालु जमान्याचा । तसा शेतकरी दृष्टीचा ॥२९॥
तानाजीच्या पोवाड्यावर । सूत पुर्णकर ॥
होउनी परितोषक दिधले । रुपये सन्मासे अर्पियले ॥३०॥
तुकाराम अभंगाची टिका । आन बोध ऐका ॥
तसी जगदेवाहि मल्हारावली । नेमि चैतन्य ति पद्यावली ॥३१॥
या परी ग्रंथ अमोलिक । किरकोळ अनेक ॥
नाही घेतले यांत गणती । संग्रह कविनांचाही तो अती ॥३२॥

वक्तृत्व त्यांचे हो फार । असे जोरदार ॥
होते लेखक ते आणि कवि । अमोल सेवा किति दिली ॥३३॥
हरदासि कितिनहि वार । करति छानदार ॥
गीतेतिल तत्व बोध करिती । गीता सर्वहि पाठांतर ती ॥३४॥
शोलापुरचे गीता समेलनी । दाविली म्हणुनी ॥
गीता बेचाळिस मिनिटांत । नंबर पहिला केला हात ॥३५॥
उत्तालापुरी होउनि सन्मान । केलि अर्पण ॥
गीता चांदीच्या कव्हराची । नौबत झडली कीर्तीची ॥३६॥
सेवा हि अमोलिक बघुनी । अनेक संस्थांनी ॥
जबाबदारीचे अधिकार । वाहिले त्यांचे अंगावर ॥३७॥
तालुका काँग्रेस कमेटिचे । आणि बोर्डाचे ॥
चेअरमन पदी विराजमान । त्यांनाची केले जनतेन ॥३८॥
समासदहि होते प्रांतिकचे । काग्रेस कमेटिचे ॥
मराठा मजुर परिषदेचे । त्याजकडे पद अध्यक्षाचे ॥३ ॥
आजन्म परोपकार केला । म्हणुनि वर आला ॥
अष्टपदि चढला गरिबितुन । झाले नच कइकांना सहन ॥४०॥
कर्तव्ये दीप चमकला । प्रकाश पसरला ॥
परी विरोधला हो दुष्टांनी । कथां येईल पुढच्या कवनी ॥४१॥
ज्याने जगति जन्मा येऊनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा या शुर मर्दाचा । ऐका सांग चित्त साचा ॥४॥

O D B JUN M

भाग १ ला समाप्त.

NATIONAL ARCHIVES OF INDIA